ISSN 2248-972X

# अहिराणी साहित्य व लोकसाहित्य

प्रा. डॉ. सुरेश पाटील,
मुक्त विद्यापीठ, नाशिक

मराठी साहित्यात १९६० नंतर काही नवीन प्रवाह-प्रकारांचा समावेश झाला. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य स्त्रीवादी साहित्य अशांसारख्या प्रवाहांनी मराठी साहित्यात भर घातली. त्यापूर्वीचे साहीत्य केवळ पुण्या-मुंबईचे साहीत्य म्हटले जायचे. पुण्यातील सदाशिवपेठी, मुंबईतील चाल-संस्कृती, बकाल वस्ती, कोकणातील निसर्ग आणि तेथील मध्यम व उच्चवर्गीय संस्कृतीचे चित्रण सातत्याने होत राहिले. आजही बहुसंख्य चित्रपटांचे आणि दूरचित्रवाणी मालिकांचे विषय त्यापलीकडे प्रगती करू शकलेले नाहीत. दरम्यानच्या काळात मराठवाडा, विदर्भ, वऱ्हाड येथील संस्कृतीचे चित्रण प्रतिबिंबित करणाऱ्या काही लेखन कृती आकार घेताना दिसल्या. चांगले ग्रामीण साहीत्य पुढे आल्याने या परिसरातील संस्कृती साहित्यात प्रतिबिंबित होऊ लागली.

मात्र मध्य आणि उत्तर महाराष्ट्राचे व त्यातील समाजजीवनाचे लक्षात घेण्याजोगे लेखन झाले नाही. नासिक परिसर मध्य महाराष्ट्रात मोडतो. या शहरात नामवंत साहित्यिक झाले. या साहित्यिकांचे लेखन पुणे, मुंबईआणि कोकण संस्कृतीचा संदर्भ घेऊनच जन्माला आलेले दिसते. कुसुमाग्रजांचे साहित्य काही प्रमाणात प्रांत, धर्म, संस्कृतीच्या मर्यादा ओलांडणारे असले तरी त्यातील बहुतांश साहित्यकृती व इतरही नाशिकमधील साहित्यकृती मध्यमवर्गीय संदर्भांचे बोट धरूनच जन्मास आल्या आहेत. या साऱ्यांचे मूळ कोकण, पुणे, मुंबई असल्याने त्यांना गोदावरीच्या उत्तरेकडील सांस्कृतिक व समाज जीवनाकडे लक्ष देणे शक्य झाले नाही. मूळ मुद्दा असा की, मध्य व उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, जळगांव, नंदुरबार या जिल्ह्यातील गोदावरी, गिरणा, मोसम, तापी, पांझरा या नद्यांच्या प्रदेशालागतच्या ग्रामीण लोकजीवनातील संस्कृती विशेषांचे चित्रण करणारे, येथील माणसांचे रंग दर्शविणारे साहित्य आजही येत नाही, ही एक विलक्षण बाब आहे. यामागील कारणे शोधणेही गरजेचे आहे.

या परिसरातील संस्कृतीचे चित्रण मराठी साहित्यात यावयाचे असेल, तर येथील भूमिपुत्रांनी पुढे आले पाहिजे. अशा साहित्यांची निर्मिती होताना अहिराणीला बाजूला ठेवता येणार नाही. अहिराणीस राजमान्यता नसल्याने संपूर्ण अहिराणीत असलेल्या साहित्यकृतींनाही समाजात पाहिजे तसे स्थान मिळत नाही. यासाठी मराठी व अहिराणी असे मिश्रीत स्वरुपात तसेच अहिराणीत स्वतंत्रपणेही लेखन व्हावयास हवे.



अहिराणीत लिखित साहित्याची निर्मिती कमी असली तरी लोकसाहित्य मोठ्या प्रमाणावर आढळते. अहिराणी व अहिराणी लोकसाहित्याचा अभ्यास दा. गो. बोरसेंनी मूलभूत स्वरुपात केला. अहिराणी भाषा मंडळ स्थापन करून 'अहिराणीची कुळकथा' व 'अहिराणीचे संशोधन' ही अभ्यांसपूर्ण पुस्तके त्यांनी लिहिली. प्रा.सदाशिव माळी, आबा चारोस्कर, वि.का. भागवत, प्रा. राजा महाजन, डॉ. म.रा. जोशी, डॉ. रमेश सूर्यवंशी, प्रा. शं क.कापडणीस, यांनी अहिराणीसाठी योगदान आले आहे. याशिवाय धो.वि.जोशी, स.सो.सुतार, प्रा.कृष्णा पाटील, रामदास वाघ, डॉ.दिलीप धोंडगे, डॉ.बाळासाहेब गुंजाळ यांनीही स्फूटलेखन केलेले आहे.

अहिराणीत कादंबरी लेखनात दा.गो.बोरसे यांची 'साडीचोळी', राजा महाजन यांच 'सूर्यानी लेक', श्रीराम अत्तरदे यांची 'सावलीच्या उन्हात', ग.द.माळी यांची 'जिभाऊ' तसेच डॉ. बापूराव देसाई यांच्या 'आख्खी ह्याती', 'धोंडी धोंडी पाणी दे,' 'लबाडनी दुनिया', व 'कुढापा' यांनी चांगले योगदान दिलेले आढळून येते. या सोबतच सुधीर देवरे यांचे 'ढोल' रामदास वाघ यांचे 'गावशीव, तसेच विविध महाविद्यालयांची वार्षिक नियतकालिके यांनीही अहिराणीतील साहित्यानिर्मितीस आणि लोकसाहित्य संकलनात मोलाचे काम केले आहे.

### अहिराणीतील समृध्द प्रांत : लोकगीते

लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या नवनवीन दिशा अलीकडे विकसित होत असून आंतर्विद्याक्षेत्रीय संशोधनासाठी लोकसाहित्य हे महत्त्वपूर्ण ठरले आहे. मौखिक साहित्याची दखल घेतल्याशियाय मराठी वाङ्मयाचा इतिहास पूर्णांशाने लिहिता येणार नाही", असे कै. वि.का राजवाडे यांनी म्हटले होते. प्रत्येक संस्कृतीची मौखिक साहित्य परंपरा चालत आलेली असते. विदग्ध वाङ्मयाप्रमाणे हे लोकसाहित्य कोणा एका व्यक्तीचे नसते. त्यावर संपूर्ण समाजाची मालकी असते. त्या त्या प्रदेशातील लोकमाणसाचे दर्शन त्यातून घडत असते.

### लोकगीतांची परंपरा

लोकगीतांची परंपरा प्राचीन आहे. अगदी आदिम अवस्थेत मानव टोळ्या करून राहू लागला. तेव्हापासून लोकगीतांचा प्रवाह अखंडपणे वाहताना दिसून येतो. वेद, पुराणे ब्राम्हणग्रंथ, बौध्द आणि जैन वाङ्मयातही लोकगीतांचे उल्लेख आढळतात. मात्र उपलब्ध लोकगीतांत स्त्रीगीतांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे.

महाराष्ट्रात लोकसाहित्याचा अभ्यास मेरी फ्रियर या विदुषीने एकोणाविसाव्या शतकाच्या मध्यावर सुरु केला. सुरुवातीचे सर्व अभ्यास केवळ संकलनात्मक स्वरूपाचे होते. ना. गो. चाफेकर, साने गुरुजी, कमलबाई देशपांडे, दा. गो. बोरसे, डॉ. नांदापुरकर, सरोजीनी बाबर

यांनी व्यापक संकलन केले. पुढे वि. का. राजवाडे, दुर्गा भागवत, डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. रा. चि. ढेरे, तारा भवाळकर यांनी लोकसाहित्यासंबंधी विपुल लेखन केले.

### अहिराणी लोकगीते

अहिराणी लोकगीतांमध्ये स्त्रीगीतांचा समावेश मोठ्या प्रमाणात दिसतो. पूर्वीच्या काळापासून गावागावातून स्त्रियांना विविध प्रकारची कामे करावी लागत. घरात दळण-कांडण-वाळवण करताना, शेतात निंदणी, कापणी, निवडणी इत्यादी कामे करताना, बाळाला झोका देताना, झोक्यावर बसताना, लग्नविधी, कानबाई, गौराई बसविताना स्त्रिया गाणी म्हणत. यंत्रयुगात पिठाच्या गिरण्या आल्या. कांडप यंत्रे आली. शेतीतही कष्टाची कामे कमी झाली. यामुळे काही लोकगीते विस्मृतीत गेली आहेत. काहीजात आहेत. लग्नसमारंभासाठी म्हटल्या जाणाऱ्या लोकगीतांचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. आधुनिक प्रसार माध्यमांनी जगभरातील संगीत तसेच घडामोडी गावागावात आणि घराघरात पोचविल्याने लोकगीतांच्या चालीबरोबरच शब्द व आशयांतही बदल होत आहे.

या लोकगीतातील स्त्रीगीतांत ओव्या मोठ्या प्रमाणावर समाविष्ट आहेत. विविध विषयांवरील असंख्य ओव्या गावोगावी मिळतात. यात विविध नाती-गोती, देव-देवता-ग्रामदेवता, घर-कुटुंब, माहेर-सासर, दळण-कांडण, सण-उत्सव, नवस, संसार, प्राणी, पक्षी, ऋतू, सूर्य, चंद्र, तारे, नक्षत्रे, स्त्री, पुरुष, मैत्रीण, पाण्याची वाट असे निरनिराळे विषय हाताळलेले आढळतात.

### क्षेत्रीय प्रतिमानसृष्टी

समाजभाषाविज्ञान ही १९६० नंतर विकास झालेली ही एक स्वतंत अभ्यासशाखा आहे. भाषेत योजला जाणारा कोणताही शब्द हा निजभाषिकांच्या सांस्कृतिक विश्वाचे प्रतिनिधित्व करतो. 'भाषेबाहेर वास्तव नसते', याचाच अर्थ भाषा हेच वास्तव असते. अहिराणी लोकगीतातील क्षेत्रीय अनुभवविश्व हे बागलाणी बोलीतील क्षेत्रीय प्रतिमान सृष्टीतून आपोआपच व्यक्त होते.

अहिराणी लोकगीते ही कृषिसंस्कृतीत नांदणाऱ्या, गावगाड्यात जगणाऱ्या ग्रामजनांची गीते आहेत. त्यामुळे ग्रामजीवनाशी संबंधित प्रतिमानसृष्टी ही अहिराणी लोकगीतांमध्ये आढळते. उदाहरणार्थ, बलुतेदारी पद्धतीप्रमाणे शेतकऱ्याने शेती करायची व सुतार-लोहार-पांचाळांनी शेतीला पूरक अशी आयुधे तयार करावयाची. त्यांची दुरुस्ती करावयाची. त्यासाठी शेतकऱ्याने त्याला वार्षिक मेहनताना म्हणून शेतात पिकणाऱ्या धान्यातून दरवर्षी धान्य घावे लागे. याला 'गव्हाई' असे म्हणत. या प्रथा आज बंद होत आहेत. आज सुतार-लोहार-पांचाळही रोख पैसे घेऊनच कामे करताना दिसत आहेत. परंतु यासंबंधित



लोकगीते अद्यापही जिवंत आहेत. आपल्या भावाला मुलगा झाला. त्यासाठी पाळणा बांधणारी बहीण एक लोकगीतात म्हणते,

सुतार लव्हार भाऊना गव्हाईवर, सुतारधरना पाळणा, लव्हारघरना साखळदोर

सुताराने पाळणा घडला, लोहाराने त्यासाठी साखळदोर तयार करून दिला. हे दोन्ही सुतार-लोहार भावाच्या 'गव्हाई' वर आपला निर्वाह करतात असे बहीण म्हणते. कौटुंबिक भावविश्व आणि ग्रामसंस्कृती यातील अनुबंध यातून स्पष्ट होतात.

धुळे, नंदुरबार परिसरात 'गुजर' लोक साधन आहेत. त्यामुळे भावाचे वैभव गाणारी स्त्री आपल्या भावाला 'गुजर' म्हणते. प्रतिष्ठेचा क्षेत्रीय कल्पनाबंध हा असा अप्रत्यक्षपणे प्रगत होतो. भाऊ बहिणीला मूळ येतो तेव्हा नुकताच टांगा घेऊन येत नाही. तर घोडा सजवून नटवून आणतो. भावाच्या श्रीमंतीचे ते प्रतिक आहे. अशी 'वयली' फार थोड्या जणांकडे असायची. म्हणून आपल्या भावाचे वर्णन करताना ही क्षेत्रीय प्रतिमा या लोकगीतात पुढीलप्रमाणे आलेली दिसते.

शंभरना घोडा याले साठ्ना तौबरा, भाऊले दखीसन वकील झाया तो घाबरा
शंभरना घोडा पन्नासनी वयलीले, भाऊ जास मूळ राजस बहिणीले

'कमोदीचा तांदूळ' हे एक येथील क्षेत्रीय वैशिष्ट्य. समान आकाराचा शुभ्र दाणा ही त्याची महती. आपल्या भावाचं रुप वर्णन करणारी बहीण ह्या क्षेत्रीय प्रतिमेचा उपयोग करते. आपल्या भावाचे दात हे कमोदीच्या तांदुळासारखे शुभ्र व दाणेदार असल्याचे ती म्हणते. तसेच स्वयंपाकात बंग्शी गहू' ही वैभवसूचक उपमा आली आहे. या परिसरात आढळणारे 'हिवर' हे काटेरी झाड आहे. याचा काटा विषारी असतो. म्हणून,

हिरवनी साया बसू नको मायबाई, मुडा याना काटा मया हिवरले नही

असे हिवर वृक्षाचे वर्णन येते. कपटी माणसाला हिवर वृक्षांची उपमा देण्यात येते. या तीक्ष्ण काटयाच्या झाडाची प्रतिमा अहिराणी लोकरामायणात सितेच्या दुखःसंबंधी येणाऱ्या विलापिकेत पुढीलप्रमाणे आलेली दिसते.

सीताबाई रडे झाड-झाडले गयर दाटे, चईत महिना पाला हिवरले फुटे

रावणाने सीतेला पळवून नेले तेव्हा रानातली झाडंसुध्दा गहिवरली. एवढे कठोर हिवरचे झाड पण तेही मनाने अलवार झाले. चैत्रात हिवरला पालवी फुटते, तेव्हा हे काटेरी झाड

अगदी कोमल, नाजूक वाटते. सीतेच्या अपहरणाच्या दुःखाने हिवरलाही आसवे फुटली. इतका हळवेपणा व्यक्त करण्यासाठी या लोकगीतात ही क्षेत्रीय उपमानसृष्टी अवतरलेली दिसते.

दूरथुन दिसे हाई पंढरी लाल लाल, सोनानी सुपली रुख्मी पाखडे गुलाल

या ओवीतून अहिराणी गृहिणी आपल्या स्वयंपाक घरातील परिमाणातून पंढरपुरचे मोल ठरवते.

पंढरपुरात गल्लोगल्लीले माळणी, देव इठ्ठलनी रानी शाक सोदे कारलाणी
पंढरपुरात देव इठ्ठल हालवाई, सोनानं तराजू पेडा मोजे रुखमाई
रुखमिनिनी चोळी देव बसना शिवाले, पसा पसा मोती लाये चोळीना बाहीले.

या ओव्यातून विठ्ठल-रुखमाईचे गीत गातांना येथील दैनंदिन जीवन स्पष्टपणे दिसते. माळणी, हालवाई या दैनंदिन परिचयाच्या व्यक्तिमत्वांचीच उपमा विठ्ठल- रखुमाईस दिलेली आहे.

'मांग्या तुंग्या देवडोंगरी' या क्षेत्रवर्णनपर गीतातून प्रत्येक गावाचे पृथगात्म वैशिष्ट्य तसेच लोकांचे स्वभावविशेष सांगण्यात आले आहेत. उदाहरणार्थ, अंतापुरच्या लोकांचा स्वभाव 'डांबरट' तर याने-उत्राने येथील लोक 'कजाना आट' म्हणजे भांडखोर असतात. नामपूरला बाजारपेठ तर मालेगावला मुस्लीम लोक जास्त असल्याचे या गीतात म्हटले आहे. त्याशिवाय इतरही गावांची वैशिष्टे आहेत.

अंतापुरना लोक डांबऱ्याखोर, यान-उतरानं कजाना आटं,
नामपुरले बाजारपेठं, जायखेडाले पोलीसपेठं
आंबासनले आंबराई दाटं, महडगावले कारल्या दाटं
कजाडागावले खट्टास्ना बेटं, पव्हानाना लोक काळाकुट्टं

असा क्षेत्रीय स्वभाववैशिष्ट्यांचा अंतर्भाव या लोकगीतात केलेला आढळून येतो.

सारांश, अहिराणी भाषिक लोकजीवनाचे सम्यक चित्रण या गीतातून आढळते. त्यासाठी योजली गेलेली प्रतिमानसृष्टी वा दृष्टांतांची योजना ही खास येथील क्षेत्रीय जीवनसरणीतून आलेली आहे.

**स्त्री-प्रतिमेतील नेणिवेचे दर्शन**

स्त्रियांच्या अनुभवविश्वातील वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमानसृष्टी या लोकगीतांतून आढळते. स्त्रीवादी समीक्षादृष्टीतून या प्रतिमानसृष्टीचे आकलन करवून घेतले तर स्त्रीमनातील सामुहिक



नेणीवेचे दर्शन घडू शकते. पती हाच स्त्रीचा निवारा असतो. तो नसला तर तिचे जीवन अर्थहीन बनते. मंगळसूत्र, कुंक ही तिच्या पतिप्रेमाची आणि जीवननिष्ठेची प्रतीके कशी आहेत, ते पहा,

शेरभर सोनं सोनं नही जे कामनं, कपाळना कुंकू मंगळसुतरं रामनं

शेरभर सोन्यापेक्षा कपाळावरचे कुंकू आणि 'रामा' च्या नावाचे मंगळसूत्र याचे मोल मोठे असते. मोठे 'चूनगच्चीचे घर' असले तरी नवऱ्याशिवाय ते भकास, सुनसान वाटते. हा भाव अभिव्यक्त करतांना अहिराणी स्त्रीमन म्हणते,

दिशी देवराया माले काही नको दिऊ, कपाळना कुंकू याले हात नको लाऊ
कोन्या गाई गये मन्हं मंगळसूतरं, असं सूनं लागे मन्हं चुनगजी जोतरं

देवाकडे पतीव्यतिरिक्त ती काहीही मागत नाही. पती कुठे परगावी गेला तरी तिला घर सुने सुने वाटते. पतीच्या सुखासाठी अहोरात्र झटणारी, कष्ट उपसणारी, कुळाचे आचारविचार पाळून धर्माचरण करणारी अशी स्त्री या लोकगीतांतून व्यक्त होते.

कोन्ही झायी दिटं मन्हा तालमतोलाले, आंगनंनी खडामाटी जाऊ निमना पालाले

तिच्या लहानग्याला दृष्ट झाली म्हणून भर रस्त्यातली माती, कडूलिंबाचा पाला आणि आख्खी लाल मिरची, यांच्या साहाय्याने दृष्ट काढण्याची येथील स्त्रीची पद्धत अंधश्रध्दाळू असली तरी तिची आपल्या बाळाविषयीची वात्सल्यभावना त्यातून तितक्याच प्रकर्षाने जाणवते. मरण ही खरी दुःखमय घटना पण तेही तिला अर्थपूर्ण करून घ्यावेसे वाटते. तो भाव स्त्रीच्या मनात बघावयास मिळतो.

अहिवं मरण दारे सोनानं सरणं, देव तुन्हा दारे कुंकून बिंद्रावनं
अहिवं जं मई इन्हा सिकावर दही, भरतार म्हणे गवळण मन्ही गाव गई

अहिवं मरण म्हणजे पतीच्या आधी स्वर्गवास. अशा मरणाची ती इच्छा प्रकट करते.

**सामुहिक नेणीवेतीत 'अनिमस' चे दर्शन**

स्त्रीच्या नेणिवेतील पुरुष प्रतिमांतून लोकगीतामधील अनोखे अनुभवविश्र्व उलगडू लागते. सुफलीकरण विधीशी संबंधित प्रतिमान सृष्टीतून स्त्रिच्या नेणीवेतील 'अनिमस' चे दर्शन आपल्याला घडते. उदाहरणार्थ, पावसासाठी आसुसलेली धरती हा कल्पनाबंध पतीभेटीसाठी आतुर झालेल्या स्त्रीमनाचे दर्शन घडविण्यासाठी योजलेला दिसतो.

वना व्हई पाणी दुन्या म्हणे वना वना, धरतरी माता म्हणे पती मन्हा दिटायना
फुटा व्हई पाणी, फुटा व्हई काळाकिट, धरतरी माता नेसनी नीळं शितं

येथे काळ्याकुट्ट ढगांतून आलेला, कोसळणारा पाऊस हे पतीचं प्रतिक आहे. आणि ह्या कोसळणाऱ्या पाण्याला झेलणारी, सतत रुजवणारी धरती हे पत्नीच, स्त्रीचं प्रतीक आहे. स्त्री-नेणिवेतील 'अनिमस' चे रूप हे पत्नीचं, स्त्रीचं प्रतिक आहे. स्त्रीनेणिवेतील 'अनिमस' चे रूप हे असे 'पावसा' च्या पुरुष प्रतिमेतून प्रकट झालेले दिसते. एका लोकगीतात पुरुषाला 'उगरा कुळीद' म्हटले आहे.

नारी बाई म्हणे मन्हा जवाई गुणात, उगरा कुळीद झाया पसार रानात

पुरुष हा हेकेखोर असतो. राकट असतो. स्त्रीला आलेला हा पुरुषविषयक अनुभव 'कुळिदा' च्या उपमेतून व्यक्त होतो. याउलट स्त्रीमन हे अलवार, फुलून येणारे, मऊ होणारे असते.

आंबानी आंबराई चिंचबाईले फुलोर, हात भरी भरी मन्ही बाईना बिलोर

सौभाग्य लेणं म्हणून बांगड्या भरतांना ती आंब्याला मोहर यावा किंवा चिंचेला फुलोर यावा तशी मनातून बहरून येते. हा 'बिलोर' तिच्या मनातील नवतीच्या बहराशी संवादी आहे. स्त्रीच्या नेणिवेतील निगूढ असे 'अनिमस' चे रूप अप्रत्यक्षपणे ह्या गीतातून डोकावतांना दिसते. स्त्रियांच्या अनुभवविश्वाशी संबंधित प्रतिमानसृष्टी ही लोकगीतात वारंवार आढळून येते.

### स्वयंपाकघरातील प्रतिमानसृष्टी

स्वयंपाकघरातील वस्तू, खाद्यपदार्थ यांच्याशी संबंधित उपमा, रूपके, दृष्टांन्त यांची रेलचेल अहिराणी लोकगीतात आढळून येते. स्त्रियांच्या अनुभवविश्वाची संवादी अशी ही प्रतिमानसृष्टी असल्यामुळे काव्यानुभवातील आशय अधिक जिवंतपणे अभिव्यक्त होतो. उदाहरणार्थ, घरोटयावर दळण दळून श्रमभाराने ती घामाघूम होते. साऱ्या शरीरातून घामाच्या धारा वाहू लागतात. या शरीर मानसिक अनुभूतीचे वर्णन असे येते,

घरोट मी वढू आंगनं पानी पानी, माय तुन्हं दुधं पघळी गयं जसं लोणी

आईच्या दुधावर पोसलेला आपल्या स्त्रीदेहाला लोण्याची स्निग्धता आहे. आईच्या प्रेमाने ओथंबलेल्या मनाने आईशी असलेला आपल्या रक्तसंबंधातील स्नेहाळ भावबंध हा लोण्याच्या प्रतिमेतून व्यक्त केला आहे. आणि घामाच्या धारांचा शरीर अनुभव 'लोणी पघळले' या



रूपकाच्या योजनेतून अभिव्यक्त केला आहे. स्त्रियांच्या अनुभवसृष्टीतील शरीर मानसिक ऐक्यातील लग्नसंबंध स्पष्ट करण्याच्या दृष्टीने ही प्रतिमा पुरेशी बोलकी आहे.

सतत केलेल्या कामांमुळे जी शरीराची नासाडी होते. त्याची वेदना व्यक्त करतानाही स्वयंपाकघरातील उपमाच ती योजते.

दळतं रांधत मन्हा हातनी चाळणी

चाळणीची उपमा ही खास स्त्रियांच्या उपमानसृष्टीचाच नमुना म्हणायाला हवा. समृद्धीसूचक वर्णन करताना 'सोन्याचे घंगाळ', 'चांदीचे वगराळे' अशी उपमानसृष्टी वापरून श्रीमंतघरच्या धूरपताबाईचं डाळ वाढण्याचेही दिमाखदार पणे वर्णन केले जाते.

संसारात कितीही जीव घातला तरी कोणत्याही क्षणी परमेश्वरांचं बोलावणं आलं तर मरणाला सामोरे जावेच लागते. अशा वेळी संसारासाठी केलेली धडपड जशीच्या तशीच राहून जाते. त्यामुळे बालपणी भातुकलीच्या खेळापासून संसार मांडणाऱ्या स्त्रीला जीवनविषयक तत्वज्ञान ऐकविण्यासाठी स्त्रियांच्या अनुभव विश्वाची संवादी असा भाव पुढीलप्रमाणे व्यक्त होतो,

कया सवंसार आठेला तठेला, वनं देवानं बलावणं लुगडं ऱ्हायनं खुंटीला

देवाजीच्या मनात आलें तर दुभत्या गाई-म्हशींच्या घरातल्या माणसालाही उपाशीच निघून जावे लागते. आपल्या हाती काहीच नसते. सगळे 'दैवाधीन' असते. असे हे चिंतन स्त्रीसुलभ प्रतिमानसृष्टीतून प्रकट होतांना दिसते.

महाप्रस्थानपर लोकगीतांमध्ये आपल्या मृत्युची अनुभूती मांडणारी स्त्री, 'जीव जाणे' म्हणजे 'नदीच्या थडीवर घागर जाणे' अशा स्त्रीवादी प्रतिमेतून व्यक्त करते.

### कौटुंबिक भावचित्राभिव्यक्ती

कौटुंबिक जीवनातील नात्या-गोत्यातील भावसंबंधातून विविध भावचित्रे आकारास येतात. आईची माया (मायनी मया), वडिलांची माया, बहिणीचे प्रेम, भावाचे प्रेम, पती-पत्नीमधील नाजूक प्रणय तसेच आपलेपणाचे भाव, नणंद-जावांमधील आगळेवेगळे भाव, सासूचा सासुरवास, तिच्या मनातील सुनेसंबंधीचा भाव, सखी-शेजारिणीशी होणारे हितगुज आणि हेवेदावे अशा असंख्य भावांची चित्रे या लोकगीतांत येतात.

लग्न होईपर्यंत स्त्री आईवडिलांकडे लहानाची मोठी होते. बालपण सुखात जाते. या आठवणींची अभिव्यक्ती अगदी सुखद असते. बालपणी मैत्रिणींसमवेत खेळताना, बागडतांना

लुटलेला आनंद, आईवडिलांनी केलेले लाड, कौतुक, माया म्हणजे तिच्या भावी आयुष्यासाठी सुखाचा जणू ठेवाच असतो. म्हणून सासरी गेल्यावर तिला माहेर आठवते. मनात असलेली खळबळदेखील तेथे सहजगत्या व्यक्त करता येत नाही. जात्यावर ओव्या म्हणताना ती मन मोकळे करीत असे. पुढे आयुष्यभर तिला इतर कितीही सुखे मिळाली तरी आईवडिलांचे प्रेम त्यापेक्षा वेगळेच असल्याचे तिला जाणवते म्हणून ती सहज म्हणते,

जाऊ बजारले, बजारले सर्व काही, नाना मन्ही माय, अमृतन्या कुप्या नही

बाजारातून सर्व काही आपण विकत घेऊ शकू पण जन्मदात्यांचे प्रेम मात्र मिळू शकत नाही, हेच यातून सूचीत होते. शिवाय,

मायना हातनी यादगिरी ऱ्हाई गई, उन्हं उन्हं पाणी डोंगरनी शिखाखाई

जो पर्यत आईवडील हयात असतात, तोपर्यंत तिचे अधून मधून माहेरी जाणे होत असते. भाऊ -भावजाईच्या राज्यात मात्र तिचे माहेर बंद होते तेव्हा,

जव नानामाय मंग माहेर कसानं, आमरुत पाणी वर शेवाळ मातनं

असा टोमणा ती भावाला मारते. आपल्या आई वडिलांनी दिलेली शिकवण ती ध्यानात ठेवते.

माले शे पईन नाना मन्हा केसऱ्यांनी, हूब-हाऊ नही दोन तठे तिसऱ्यानी
सांगा शिकाडाना माले राग नही वना, जल्म देता पिता मन्हा गुरु भारी शाना

कौटुंबिक जीवनातील या नात्यातल्या भावसंबंधातून आकारास येणारी भावचित्रे रसिकांना एक प्रकारचा आनंद मिळवून देतात. फुलाची एकेक पाकळी हळूहळू उमलत जावी आणि तिचा सुगंध हळुवारपणे दरवळावा आणि त्याचा मोहक गंध आस्वादावा अशी प्रक्रिया ओवीगीतातील भावचित्राभिव्यक्तीचा आस्वाद घेताना होते.

## अहिराणी लोकगीतातील विचारसौंदर्य

जीवनविषयक तत्वज्ञान, आप्तसंबंधाचे मर्मस्थान, श्रीमंती गरिबीतील विवेक, अस्मितायुक्त जीवन जगण्याची रीत, प्रेम आणि श्रध्देचे महात्म्य सांगणारी कितीतरी लोकगीते अहिराणीत आढळतात. ह्यातील रचनेत सुभाषितात्मकता आहे आणि आशयात विचारसौंदर्य भरून आहे. काही निवडक उदाहरणांनी या विचारसौंदर्याचा कानोसा घेऊ.

काशी काशी करू काशी कोणत्या खंडातं, काशीन तिरीथ नानामायना तोंडातं
काशी काशी करी लोक चालना धावतं, माय नाना मन्हा काशी तीरथं गावातं



आई वडिलांच्या ठिकाणी देवत्व पाहण्याचा विचार वरील ओव्यातून दिसतो. आपल्या आईवडिलांनी मुलांसाठी सोसलेल्या खस्ता, मुलांसाठी सोसलेल्या हालअपेष्टा स्त्री मन कृतज्ञतेने व्यक्त करते. माणसाला नातीगोती तर अनेक असतात. पण आईची माया व इतरांची माया यात फरक असतो असे येथील स्त्री म्हणते.

माय म्हणल्यानं व्हटले व्हटं भिडे, जिजी म्हणल्यानं आंतर दूर पडे
माय तुन्हा गुण शेजी कराले लागनी, मुळ तुम्ही चव साखरले नही वनी

खरे प्रेम, खरी माया वगळता लटकी नाती कशी असतात, ते वरील ओव्यांवरून ध्यानी येते. अहिराणी लोकगीतातील जीवनसंदर्भ अहिराणी मनाने जोपासलेल्या जीवनमुल्यांची जाणीव करून देणारा आहे. वडिलधाऱ्यांविषयी आदर बाळगावा, सासू- सासऱ्यांना देव्हाऱ्यातील देव मानावे असा संस्कार आजही येथे स्त्रीमनावर केला जातो. स्त्रियांचे बोलणे, चालणे, हसणे कसे असावे किंवा असू नये यासंबंधीचाही विचार लोकगीतात दिसतो. स्त्रीने बेफिकीर वागू नये असा उपदेश करणारी ही ओवी पहा,

हासू नको नारी तुन्हं हासनं परकारनं, आसे जाही पाणी तुन्हा चतूर भरतारनं

अहिवं स्त्रीने कसं वागावं ? कुठेही हसू नये याचाही धडा अहिराणी ओवीत पदोपदी मिळतो.

अहिवं नारीना हात रिता वं नसावा, कपाळले कुंकू पायी जोडावा असावा

अशी शिकवणही दिली जाते. वरील ओवीतून तिचा आचारधर्मच सांगितला आहे. माणसाने गर्व करू नये. हा गर्व जीवनातला खराखुरा आनंद नष्ट करतो. म्हणून अहिराणी स्त्री म्हणते,

धायानी नारले नही मणोसनी गोडी, अशी वनी येळ गाठ झिरोळशी पडी

धनसंपती नाशवंत आहे. क्षणिक सुखाची आहे. आज आहे तर उद्या नाही. याचे सार पुढील ओव्यात आहे.

मन्हं मन्हं करी नारं बसनी दारातं, वनं देवनं बल्हावंन सर ऱ्हायनं घरातं
पयसानी नारं तुले पयसानं येडं, मोऱ्हे चाले मडं मागे खजिनान गाडं

भौतिक संपत्ती फझुल आहे असा विचार येथे व्यक्त केलेला दिसून येतो. हे सर्व विचार अत्यंत साध्या सोप्या आणि सुटसुटीत शब्दांतून मांडण्याची लोकगीतांची धाटणी वैशिष्ट्यपूर्ण आहे.

आतमा राजाले भारी संसारनं येडं, पडं धरणीले आंगे वस्तरं झाये जडं
आतमा कुंढीनं भांडणं, आतमा कुधीन भांडणं, आतमा बेमानं दिधं कुढिले सांडूनं

अशा स्वरूपाचे चिंतनगर्भ विचार अहिराणी लोकगीतात पहावयास मिळतात. असे विचार सहजस्फूर्तपणे आविष्कृत करून आहिरणी मनाने विचारसौंदर्याचा अमोल असा ठेवा दिलेला आहे.

माणसाने स्वाभिमानाने जगावे, स्वतःची अस्मिता जपावी, कुणाकडेही हात पसरू नये. तसेच गरिबीतही आपले दारिद्र्य उघड्यावर आणू नये, हे पुढे ओवीवरून दिसते.

हासुनी, बोलुनी आगळ घालवा मनले, किलवानं तोंड दिसू दिवूना जगले

गरिबी असली तरी चोरी लबाडी करू नये असे येथील संस्कृती सांगते,

चोरी चपाटीनं नही मन्हा जीवले लखनं, नाना मन्ही माय सदगुरूनं वचनं

लबाडीपासून दूर राहण्यासाठी मिळालेले संस्कार येथे व्यक्त होतात. समाजात काही वेळी सत्याच्या मार्गाने चालणाऱ्याच्या पदरी अपशय येते. तर लबाडीने वागणाऱ्या व्यक्ती यशस्वी होतात. असे चित्र जेव्हा बघावयास मिळते. तेव्हा वैफल्यग्रस्त झालेली स्त्री म्हणते,

खरं वागी वागी खराले वना खेवं, लबाडना घर पाणी भराले वना देवं
चीरीना मनोरा तुन्हं चोरीवर चित्तं, तुन्ही कमाईले देव देयेना बरकतं

असे खोट्याच्या कपाळी गोटा आणि खऱ्याचे खरेपण ही सांगते. जीवनात माया, प्रेम याबरोबरच मैत्रीचे मोल फार आहे. मैत्रीमुळे जीवनात आनंद निर्माण होऊन ते सुखावह बनते. नात्या-नात्यातील व्यक्तीबद्दल आपलेपणा तर असतोच त्याचबरोबर शेजारील सखीचेही प्रेम स्रीच्या ठिकाणी असते.

शेजी तुन्हं तान्हं मन्हघर कोणी आनं, पानीयाना मिशे मी ते दुधवरी न्हानं



शेजारणीचे बाळ आपल्या घरी आल्यावर, त्याची मायेने अंघोळ घालताना तिचे भान हरपते. आपले व शेजारचे हेदेखील भान तिला रहात नाही. पूर्वी गावोगावी पिठाच्या गिरण्या नव्हत्या. संपूर्ण कुटुंबाचे दळण स्त्रीला दररोज पहाटे उठून दळावे लागत असे. तेव्हा ती म्हणत असे,

आस्तोरी जलम देवा घातला दुघडं, सकाळी जं उठी नितं वढई दगडं

यापुढे काही वेळा ती वैतागून म्हणते,

आस्तोरी जलम नको घालू शिरीहारी, सवसारी येउनी परायाणी ताबेदारी

स्वतः स्त्री असूनही तिला ते जीवन नको आहे. यावरून येथील स्त्री स्वतंत्र नाही. तिचे जीवन कष्टप्रद आहे, असेच स्पष्ट होते. ती दुसऱ्याच्या ताबेदारीत आहे. ते ही तिला नको आहे.

स्त्री जीवनाचे सार्थक मातृत्वात आहे. आई झाल्यानंतरच स्त्री जीवनाची व संसाराची परिपूर्ती होते, अशी संपूर्ण भारतीय संस्कृती मानते. श्रीमंतीपेक्षाही संततीला जास्त महत्व कसे दिले जाते, हे पाहण्यासारखे आहे.

लाख्या सावकार काय करशी लाखले, पोटी नाही कन्या-पूत्र धन-संपदा लोकले
देवना देवळात नंदी घागर माळना, धनसंपतिना धनी तुले नितात बाळना
लेक लेक करू लेक संपतीना धनी, लेकनावाचून हिरदं उचलेना कोणी

पुत्रप्राप्तीचे महात्म्य वरील ओव्यांद्वारे अहिराणी स्त्रीने गायिले आहे. संततीला अधिक महत्व दिले गेल्यामुळे साहजिकच जिला संतती नाही, तिचे जिने व्यर्थ समजले जाते.

सांज वांज दोन्ही बहिणी सांज वांज दोन्ही बहिणी, सांजले लाऊ दिवा वांजळे नही कोन्ही

अशी तिची केविलवाणी अवस्था व्यक्त झालेली दिसून येते.

मानवी जीवनात सत्संगतीलाही विशेष महत्व आहे. माणसाचा अनेकांशी संबंध येत असतो. अनेक बरेवाईट अनुभव त्यास येत असतात. त्यातून त्याचं मन घडत असते. त्यामुळे त्याच्या सहवासातील व्यक्तींना विशेष स्थान असते. प्रत्येक स्त्री पुरुषाचे कुणाशी तरी मैत्रीपूर्ण संबंध असतातच ! असे संबंध स्थापन करीत असताना येथील स्त्री म्हणते,

सही बहीण जोडू मनासारखी रंगू गंगू, रंगीत पाळणा तिन्हं भरतारले सांगू
सई  बहीण जोडू मनासारखी सारजा, कपाळना कुकू तिन्हा भरतारनी वरजा
सई सई करू सई मन्ही कोकणात, दिवात पदी वात सई वनी सपनात

या ओव्या वाचल्या तर येथील स्त्रीने सई म्हणजे मैत्रीण जोडताना जात-पात-प्रदेश यांसारख्या बाबींना फाटा  देऊन मनासारही सखी जोडण्याचा प्रयत्न केला आहे. सखी मिळवताना देखील पारखूनच मिळवावी, अशीच भूमिका वरील ओवी म्हणणाऱ्या स्त्रीची आहे.

अशा तऱ्हेने अहिराणी लोकगीतातून व्यक्त होणाऱ्या विचारसौंदर्यात जे विविध रंग, जीवनानुभवाच्या छटा दिसतात, त्यामुळे या सौंदर्याला एक उदात्तता आणि भव्यता आली आहे. अहिराणी लोकगीतात स्त्रियांनी गायिलेली गीते अधिक असल्यामुळे मराठी लोकगीतांपेक्षा या गीतात वेगळेपण आहे.

वरील विषयांव्यतिरिक्त धर्म, विधी, सण, उत्सव, व्रत, नवस इत्यादींवरही गीते भरपूर प्रमाणात आहेत.असहायाला सहाय्य करणे, भूतदया करणे यासंबंधीही गीते आढळतात.

धर्ममजार धर्म, धर्म कुतराना मोठा, धर्म कर बेटा त्याना जोडे नाही लोटा
देव खंडेराव वना कुतराना मिशे, शेपले लाल गोंडा, तोंड भंडारनं दिसे

येथे परमेश्वर सर्व ठिकाणी वस्ती करून असतो असा विचार अंतर्भूत आहे.

मानवी जीवनातल्या विविध अवस्था, त्या जीवनाचे अनेकविध धर्म, जीवनातील अनेक घटना, प्रसंग त्यांच्या आधारे जीवनाला उपयुक्त ठरतील व त्यामुळे जीवनात  आनंद निर्माण होईल, असे विचारांचे सुवर्णकण या लोकगीतात पहावयास मिळतात. या लोकगीतातून झुळझुळू वाहणारा हा ज्ञानाचा प्रवाह जीवनाच्या वाटचालीत निराश झालेल्यांना उत्साह देतो. या लोकगीतातून उदात्त असे विचार व्यक्त झालेले आहेत. मानवी जीवनाचे अनेकविध पैलू येथे पाहावयास मिळतात. त्यातील विचारविश्वही बोजड उपदेशप्रधान निरूपणाचे नाही. त्याला विचारसौंदर्याचे तेज दिसून येते आहे.

## अहिराणीतील  काव्यात्मता

जात्यातून पडणाऱ्या पिठाला चाफा चंदनाची उपमा दिलेली आहे. आणि दळण दळणे म्हणजे जणू चंदन किसणे आहे, असेही वर्णन आढळते. जात्यातून पडणाऱ्या पिठाचा चंदनी रंग आणि गरम पिठाला असणाऱ्या वासाचा गंध यांच्या संवेदनांचा ताजेपणा या उपमानसृष्टीतून प्रतीत होतो.  अशिक्षित समजली जाणारी अहिराणी  स्त्री आपल्या गीतात धरती  व पाऊस यामध्ये पतीपत्नीचे नाते कल्पिते.



वना व्हई पाणी दुन्या म्हणे वना वना, धरतरी माता म्हणे पती मन्हा दिटायना

जीवनातले अनुभव, घटना निसर्गाच्या माध्यमातून चित्रित  करण्याचीही किमया मनोहारी  वाटते. पाऊस आल्यावर तो आला असे लोक म्हणतात, अशा बोलण्यानेदेखील पावसाला दृष्ट होईल, अशी कल्पना हे स्त्रीमन करते.

फुटा व्हई पाणी फुटा व्हई काळाकीटं, धरतरी माता नेसनी नीळं शितं

पावसाळ्यात रान हिरवगार असते.  ही हिरवी जमीन म्हणजे पतीच्या स्वागतासाठी पत्नीने (धरतीने) केलेला शृंगार होय. या लोकगीतात बहुतेक ठिकाणी 'हिरवा' शब्दाऐवजी 'निळा' हाच शब्द बघावयात मिळतो. कारण या परिसरातील अशिक्षित लोकमाणसात हिरव्या रंगाची संकल्पना गतकाळात कमी आढळते.  उदा.  या परिसरात 'हिरवी' मिरची असे न म्हणता, 'निळी' मिरची म्हणतात.

उगना सूऱ्यादेव गाडीयानं चाकं, झाकायी जं गई पिरथमी नवलाख
येथे सूर्याला गाडीच्या चाकाची उपमा दिलेली आहे.
सुऱ्यांनी लेकीले वनं दऱ्यानं मांगनं, तिना मामाजींनी दिधी तपती आंदनं

अशा कल्पना लोकजीवनातून आलेल्या आहेत. त्यामुळे त्या वाचताना जीवनानुभवाचे दर्शन घडते.

सुऱ्यांनी लेक दुर्गाबाई सुऱ्यानी लेक दुर्गाबाई, चांद-सुऱ्या याही सुख निंघणा जवाई

अशा कल्पनाविलासातून निसर्गाचे आणि निसर्गाशी नाते असलेल्या मानवी मनाची अनेक चित्रे आपणास पहावयास मिळतात. आशय आणि तो व्यक्त  करणाऱ्या कल्पनेतील प्रतिमानविश्व पाहता आपल्याला जाणवते की, निसर्गाच्या सानिध्यात राहणाऱ्या, आपल्या शेतीवर जीवापाड माया  करणाऱ्या मानवी जीवनातील नातीगोती, त्यातील  भावसंबंध आणि त्यांच्या जीवन जगण्याच्या पद्धतीचे विशेष  सहजपणे आणि अर्थपूर्णत्वाने व्यक्त होतात.

आई, वडील, बहीण, भाऊ, पत्नी या नात्यांमधील भावसंबंधही अनेक ओव्यातून काव्यात्म पद्धतीने व्यक्त झाले आहेत.

खेतना बांधले भाऊबहिणनी आरोळी, निशीला जोंधला धोपी काढिल्या नारोळी
चाल सये पाहू मन्हा भाऊसनी खेती, निशीला जोंधळा वर टळंटळं मोती

शेतीसंबंधीच्या या ओव्यात जोंधळ्याच्या कणसाच्या जागी नारळाची कल्पना केली आहे. तसेच जोधळ्याच्या दाण्यांच्या ठिकाणी मोत्याची कल्पना केली आहे.

मुरखना तोंडे नको लागू बहीण शानी, चांदसारखा भाऊ मन्हा मोतीसारखं त्याले पाणी

येथे भावाच्या ठिकाणी चंद्राची कल्पना केली असून त्यास मोत्यासारखेच तेज असल्याचे म्हटले आहे.

भाऊ तुन्हा गायी जसं कोंबडीनं आडं, नारीबाई म्हणे कोणता वंजारानं तांडं

आपल्या सख्या भावाविषयी नेहमी मनात आदर बाळगणाऱ्या स्त्रीने त्याचे केलेले कौतुक वरील ओव्यांत दिसून येते. भावाने पाळलेल्या पांढऱ्या शुभ्र गार्यींना कोंबड्यांच्या अंड्यांची उपमा दिली आहे. भावालाही बहिणीविषयी नितांत आदर वाटतो. तिची काळजी त्याला सतत असते. तो तिला म्हणतो,

भाऊ कशा म्हणे बहीण कासानं बासनं, जठे ऱ्हाशी हुबी, हुब हावानं दोसनं

बहिणीला मार्गदर्शन करताना भाऊ सांगतो की, भलत्याच जागी स्त्रीने उभे राहू नये. स्त्रीला काशाच्या भांड्याची उपमा देण्यामागील उद्देश हाच की तिने आपल्या इज्जतीला, संस्कृतीला जपावे. बहीण व भाची यांना आपण कितीही मदत केली, कितीही खर्च केला तरी परमेश्वर कमी पडू देत नाही. या आशयाची ओवी पहा,

बहीण भासीले नजं करवा मनाई, उपशीला झिरा पाणी वनं हुई दुनाई

ज्याप्रमाणे झऱ्यातील पाणी उपसल्यानंतर त्यास लगेच पाणी येते. तद्वतच बहीण-भाचीसाठी केलेला खर्च परमेश्वर भरून काढतो. असा काव्यमय समज अहिराणी भाषिक परिसरात प्रचलित आहे.

भाऊभाऊसनी कजा, चिखुल सोडेना पाणीले, दुन्या भारी ना दुलंगी मोड म्हणेना कोणले

कौटुंबिक जीवनातील असे अनेक साधे प्रसंग लोकगीतांत अगदी सहजपणे आल्याने ते अधिक प्रभावी वाटतात. लोकगीतातील कल्पना कधी दृष्टांताचेही काम करतात.

मनातील भाव व्यक्त करण्यासाठी निवडलेले शब्द किती तरी अर्थपूर्ण वाटतात. अशा अर्थपूर्ण शब्दांच्या योजनेतून भावरम्य विचार, चिंतनगर्भ कल्पना जेव्हा लोकगीतातून प्रत्ययास येते. तेव्हा त्यातील आनंद प्रत्ययास येतो.



घरोटाना पाळे बसन्यात मायलेकी, चाफा चंदननी पाळ भरी वनी एकाएकी
दळण दळवा जसं चंदन किसवा, नानामायले पुसवा कसा परदेश कठवा

दळण दळतांना जात्यातून बारीक पीठ बाहेर येते. त्याच्या ठिकाणी चंदन किसल्याची कल्पना वरील ओवीतून केलेली आहे. दळण दळणे हे तसे श्रमाचे काम पण ते करतांना चंदन किसण्यास जेवढे श्रम पडतात तेवढेच आपण दाखवावेत, अशी ही स्त्री म्हणते.

देव खंडेराव चंदनपुरीना पाटातं, भानाईकरता हीवं घातलं पोटातं

खंडेराव या देवाचं बाणाईनर खूप प्रेम होतं. त्यासाठी तो चंदनपुरी या थंडी (हीव) असलेल्या भागातही रहायला तयार झाला, अशी कल्पना या ओवीत आहे.

रामलक्ष्मण दोन्ही सोनीयाना मणी, त्यास्नामजार सीताबाई हिरकणी

राम-लक्ष्मणना सोनेरी मण्यांची उपमा दिली आहे. तर त्यांच्यापेक्षाही जास्त तेज असलेल्या सीतेस हिरकणीची उपमा दिली आहे. या लोकगीतात शब्दजन्य चमत्कृति आणि अर्थजन्य कल्पना अशी दोनही प्रकारची उदाहरणे सापडतात. येथील कल्पनांत अवास्तवता किंवा स्वैरपणा दिसत नाही. यामुळे या लोकगीतांना सुबकता आलेली दिसून येते.

अहिराणी लोकगीतांची वैशिष्टे :

१. अहिराणी लोकगीतांची निर्मितीप्रक्रिया ही अहिराणी लोकसंस्कृतीशी संवादी आहे. श्रम, विधी आणि संस्काराच्या प्रसंगी म्हटली जाणारी ही गीते येथील समष्टी मनाच्या नेणीवेतील भावविशवाची प्रतिके आहेत.
२. क्षेत्रीय प्रतिमानसृष्टी हे या लोकगीतांचे दुसरे वैशिष्ट्य अहिराणी भाषक समाजाचे लोकजीवन आणि श्रद्धाविश्व यातून ह्या लोकगीतांतील उपमानसृष्टी अवतरली आहे. यातूनच प्रतिमा प्रतीकांची भाषा घडलेली आहे. गव्हाई, कमोदीचा तांदूळ, बन्शी गहू, हिवरचे झाड इत्यादी उपमाने ही खांस खानदेशाच्या मातीतून आलेली आहेत.
३. स्त्रीगीते हे अहिराणी लोकसाहित्याचे मुख्य भांडार आहे. त्यामुळे स्त्रीमनातील अनिमसची रुपे या गीतांतून आविष्कृत होतात. तसेच स्त्री जीवनाशी संबंधित अनुभवविश्वातून येणारी प्रतिमानसृष्टी व भाषिक उपयोजन ठीकठिकाणी जाणवते.
४. स्फूट भावचित्रे आणि विचारसौंदर्य हे अहिराणी लोकगीतांचे वैभव असून अहिराणी भाषिक समाजाच्या अभिरुचीचेही निदर्शक आहे.

प्रा. सुरेश पाटील, नाशिक

संदर्भग्रंथसूची


बाबर, सरोजिनी (१९६४) 'मराठीतील स्त्रीधन', कॉन्टिनेण्टल प्रकाशन, पुणे

बोरसे, दा. गो. (१९८५) 'लोकसरितेच्या अमृतधारा', गिरीजा प्रकाशन, नागपूर-३४.

भवाळकर, तारा (१९८९) 'लोकसंचित, राजहंस प्रकाशन, पुणे-३०

भागवत , दुर्गा (१९७५) 'धर्म आणि लोकसाहित्य', पाप्युलर प्रकाशन, मुंबई

देसाई, बापू (१९९५) 'खानदेशी साहित्य सुरभि', शंतनू कुलकर्णी प्रकाशन, नाशिकरोड

देसाई , बापूराव (१९९६) 'लोकसाहित्य', विनय प्रकाशन, कानपूर

जोशी, लक्ष्मणशास्त्री (संपा) (१९६९) 'राजवाडे लेखसंग्रह', साहित्य अकादमी, नवी दिल्ली

कर्वे, इरावती (१९६२) 'मराठी लोकांची संस्कृती', देशमुख आणि कंपनी, पुणे

केतकर, श्रीधर व्यं. (१९२६) 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश', विभाग १८, (शरीरखंड), पुणे

मांडे, प्रभाकर (१९८९) 'लोकसाहित्याचे अंतःप्रवाह', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-३०

राजवाडे, वि.का. (१९६९) 'राजवाडे लेख संग्रह', नवी दिल्ली

सावंत, उषा (२००५) 'खानदेशातील अहिराणी स्त्री गीते', प्रतिमा प्रकाशन, पुणे-३०

व्यवहारे, शरद (२००४) 'लोकसाहित्य', तिरुपती प्रकाशन, परभणी

वरखेडे, र.ना. (१९९३) 'लोकसाहित्य व लोकपरंपरा', का.स.वाणी प्रगत मराठी अध्ययन संस्था, धुळे




## सगळ्या ऋतूत तू



तूझ्यापासून दूर जाणं कुठं सोपं असतं ?
एक फूल मनामध्ये दरवळतच असतं.

सकाळी उठून अंगणातून पाहतो तर
उगवत्या लाल सूर्यबिंबात
तुझ्या भाळावरचा टपोरा कुंकुमटिळा दिसतो

बागेत फिरतो तेव्हा
तुझं सर्वांगानं उमलणं अनुभवतो

तल्खलीत वाटेवर झाडांच्या सावलीत थांबतो
तेव्हा तुझा शीलत सहवास लपेटतो

संध्याकाळी कातरवेळी तर इतकी आठवतेस की
डोळ्यातून तूच वाहतेस

सगळ्या ऋतूत...सगळ्या प्रहरात
अनेक रुपांनी तू अशी वेढून राहिली आहेस

तुझ्यापासून दूर जाणं कुठं सोपं असतं ?
अनुरागाचं ते वियोगी रुप असतं

दत्ता हलसगीकर, सोलापूर

## रातराणी

ती फुलायची त्यावेळी
सारं जग मिटलेलं असायचं
निशेच्या गडद काळोखातच ती जगायची
असायचं फुलांमध्येही शापित हास्य।
सुगंध, रूपाचं सौंदर्य लाभलं तरी
नव्हतं निशिबी तिच्या
देवास निर्माल्य व्हायचं...
मुलींच्या केसांत सजायचं...
रात्रीचे चार क्षण जगल्यावर
पहाटे ती रातराणी
पुन्हा मुकी व्हायची
जग पाहून
ओंजळी सुटलेला रंग निसर्गाचा
मुक्या पानांचा आर्त आक्रोश करून
विचारायची त्याला,
का दिलास मज शाप अंधाराचा।

- सौ. दिशा भोसले, रत्नागिरी

## सावली

मणभार सावलीचा, घेऊन भार माथी
मी चालतो तरीही, ना अन्त ना उसंती

वाटे दिशा-दिशांना, हलकेच साद द्यावी
नादावल्या मनाने, त्यांचीच साथ घ्यावी

ह्या शुष्क माळराना, मी खिन्न, मी उदास
गतकालच्या स्मृतींचे, चीरकाल होत भास

जे मजसी प्रिय होते, सोडूनी मजसी गेले
क्षणकाल सुखभोग, चिरकाल दुःख दिधले

जडभार सावलीचा, आता मला न पेले
निर्वेत सांजछाया, दाटूनी मळभ आले.

- विदुला बंकापुरे, पुणे